दै.बीड
www.beedsuperfast.com
# सुपरफास्ट
• संपादक : अतुल शंकरराव जाधव •
• beedsuperfastgmail.com •



बीड – शिवसंवाद दौऱ्यानिमित्त बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसेना नेते, संसदरत्न डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांचे युवासेना जिल्हाप्रमुख गणेश शिरोळे व सतीश शेळके साहेब यांच्या वतीने भव्य हार घालून जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,सागर बहिर, महेश कदम, अध्यक्ष राहुल भांबे, अभिषेक कदम, निलेश थोरात, विशाल दळवी, मिलिंद काळमकर, ऋषिकेश जोगदंड, अजिंक्य वडामरे, सुजित शिंदे तसेच शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक १४५ ■ सोमवार दि. ०१ जून, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.
■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-145 ■ Monday 01 June, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4

# मध्यरात्री तोडगा; मनोज जरांगेंनी अखेर उपोषण सोडलं; विखे पाटील म्हणाले चर्चा यशस्वी

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटीतील उपोषण मनोज जरांगे पाटील यांनी मागे घेतले आहे. सरकारने ५८ लाख कुणबी नोंदी, स्वतंत्र मराठा–कुणबी मंत्रालय, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे आणि इतर प्रमुख मागण्यांवर सकारात्मकता दाखवल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी अखेर उपोषण मागे घेतले आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर अनेक प्रमुख मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाल्याची माहिती स्वत: जरांगे यांनी आंदोलकांसमोर दिली. रणरणत्या उन्हात एकदिवसीय उपोषण करत जरांगे यांनी सरकारवर दबाव वाढवला होता. दिवसभर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा सरकारचे प्रतिनिधी आणि जरांगे पाटील यांच्या अभ्यासकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर तोडगा निघाल्याचे जाहीर करण्यात आले.**







जरांगे पाटील यांनी सांगितले की,आपल्या मागण्यांनुसार मसुदा तयार करण्यात आलायं सरकारने ५८ लाख कुणबी नोंदी उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. यापूर्वी ४९ लाख नोंदी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. उर्वरित नोंदींची प्रक्रिया विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून पूर्ण केली जाणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिलीयं.हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचाही निर्णय मान्य करण्यात आला आहे. कुणबी नोंदी देण्यास अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले स्वतंत्र मंत्रालयाची घोषणा मराठा आणि कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यास सरकारने तत्त्वतः मान्यता दिल्याचा दावा जरांगे यांनी केला. या मंत्रालयात स्वतंत्र कक्ष आणि माहिती अधिकारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय सातारा संस्थानच्या गॅझेटियरसंदर्भात तातडीने शासन निर्णय काढण्याची मागणीही सरकारने मान्य केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारची भूमिका काय? राधाकृष्ण विखे पाटील यांनी चर्चेनंतर सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस » पान २ वर

## आंदोलकांवरील गुन्हे, नोकऱ्यांचा मुद्दा

**मराठा आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. आंदोलनात मृत्यू झालेल्या मराठा बांधवांच्या वारसांना महावितरण आणि एमआयडीसीमध्ये नोकरी देण्याची मागणीही चर्चेत स्वीकारण्यात आल्याचे जरांगे यांनी सांगितले.तसेच जातपडताळणीच्या प्रक्रियेमुळे मराठा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश अडणार नाहीत, यासाठीही आवश्यक निर्देश देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.**

## पोलिसांना आणि होमगार्ड्सना पोलीस बॉईज असोसिएशनकडून
# उन्हापासून बचावासाठी कॅपचे वाटप



**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून देण्याची योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत गेवराई तालुक्यात तहसीलदार संदीप खोमणे यांच्या मार्गदर्शनाखाली राक्षसभुवन येथील गोदावरी नदीपात्रातून हजारो घरकुलधारकांना प्रत्येकी ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामुळे अनेक कुटुंबांच्या घरकुल बांधकामाला गती मिळाली आहे.

ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांना शासनाकडून घरकुल मंजूर झाले असले, तरी बांधकाम साहित्याच्या वाढत्या खर्चामुळे अनेकांची कामे रखडली होती. ही अडचण लक्षात घेऊन महसूल विभागाने घरकुलधारकांना मोफत वाळू देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयाची गेवराई तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.तहसीलदार संदीप खोमणे यांनी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून पारदर्शक पद्धतीने वाळू वितरण प्रक्रिया राबविली. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांना थेट फायदा झाला असून घरकुल बांधकामाचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.या उपक्रमामुळे शासनाच्या घरकुल योजनांना चालना मिळाली » पान २ वर

# माझ्याशी लग्न कर, नाहीतर फोटो व्हायरल करीन; रील स्टारविरुद्ध गुन्हा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तू माझ्यासोबत लग्न कर, अन्यथा तुझे आणि माझे एकत्र काढलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल करीन, अशी धमकी देत एका २० वर्षीय तरुणीचा मानसिक छळ केल्याप्रकरणी प्रसिद्ध रील स्टारविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पीडित तरुणी माजलगाव येथील एका नर्सिंग महाविद्यालयात जी.एन.एम.चे शिक्षण घेत आहे. तिची काही दिवसांपूर्वी सोशल मीडिया माध्यमातून रवी सिरसट या रील स्टारशी ओळख झाली होती. रवी हा विविध कार्यक्रमांमुळे प्रसिद्ध असल्याने तरुणीने त्याच्यासोबत काही छायाचित्रेही काढली होती. त्यानंतर दोघांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद सुरू होता.तक्रारीनुसार, २८ मे २०२५ रोजी तरुणी घरी असताना रवी सिरसट याने तिच्या मोबाईलवर वारंवार फोन करून लग्नासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. तरुणीने लग्नास नकार दिल्यानंतर तुझे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करीन, अशी धमकी दिल्याचा आरोप आहे.

याशिवाय आरोपीने सोशल मीडियावरून आणि वैयक्तिक संपर्कातून सतत त्रास देत तिचा पाठलाग केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे तरुणीला मानसिक त्रास सहन करावा लागला.पीडित तरुणीच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलिसांनी रवी सिरसट याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे सोशल मीडियावरील ओळखी आणि त्यातून उद्भवणाऱ्या धोक्यांबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयत रक्तदान शिबीर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



रुग्णांची आणि डॉक्टरांवरील वाढते हल्ले रोखण्यासाठी खास तैनात असलेल्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सुरक्षा गार्ड यांनी सामाजिक बांधिलकी जोपासताना अहिल्याबाई होळकर जयंती चे अवचित्य साधून जवळपास २८ सुरक्षा गार्ड यांनी येथील रुग्णासाठी रक्तदान शिबिर घेतले आज रोजी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई येथील २८ सुरक्षा गार्ड यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले स्वामी रामानंद तीर्थ रुग्णसेवा देताना अनेक समस्यांना सामोरे जाण्याची भूमिका प्रसंगी अनेकांचे विरोध मारहाण अपमान सहन करून कर्तव्य बजावत असलेल्या आणि खास करून डॉक्टर वरील वाढते हल्ले रोखण्यासाठी तैनात असलेल्या सुरक्षा गार्ड यांनी माणुसकीचे दर्शन दाखवत अहिल्याबाई होळकर जयंतीचे अवचित्य साधून रक्तदान शिबिर घेतले त्यात महिला पुरुष २८ सुरक्षा गार्ड यांनी सामाजिक » पान २ वर

## डॉ.फहमीदा अनीसुद्दीन यांना उत्कृष्ट आदर्श शिक्षिका गौरव पुरस्कार २०२६ जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात गेल्या १९ वर्षांपासून उल्लेखनीय व गुणवत्तापूर्ण कार्य करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने योगदान देणाऱ्या, इंग्रजी विषयात पीएचडी केलेल्या बीड जिल्ह्यातील पहिल्या महिला शिक्षिका तसेच सौदी रिटर्न डॉ. फहमीदा बेगम अनीसुद्दीन यांना साप्ताहिक युवा लोकमित्र चा उत्कृष्ट आदर्श शिक्षिका गौरव पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. साप्ताहिक युवा लोकमित्रच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त तसेच सहाव्या वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून पुरस्कार निवड समितीने त्यांच्या नावाची घोषणा केली आहे. साप्ताहिक युवा लोकमित्र' आणि 'युवा लोकमित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, संशोधन आणि समाजकार्यात देश–विदेशात नाव उंचावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो. उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने डॉ. फहमीदा बेगम यांनी शिक्षण आणि विशेषतः महिला सशक्तीकरणाच्या क्षेत्रात दिलेल्या १९ वर्षांच्या प्रदीर्घ योगदानाची या सन्मानासाठी एकमुखाने निवड केली आहे. डॉ. फहमीदा बेगम



अनीसुद्दीन या एम.ए., बी.एड., एम.फिल. तसेच इंग्रजी विषयात पीएच.डी. धारक असून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सौदी अरेबियातील कासिम विद्यापीठात इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून त्यांनी यशस्वीपणे कार्य केले असून शैक्षणिक प्रमुख, समन्वयक तसेच विविध विभागीय समित्यांच्या सदस्य म्हणूनही जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. अध्यापनासोबतच शालेय व्यवस्थापन समिती, शालेय विषय समिती यामध्ये सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संस्कारमूल्ये आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणा रुजविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

# गेवराईत हजारो घरकुलधारकांना तहसिलदार खोमनेंनी ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करुन दिली

**बीड । प्रतिनिधी**

सध्या उन्हाचा पारा कमालीचा वाढला असून, नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही ऊन, वारा आणि पावसाची कसलीही तमा न बाळगता पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि गृहरक्षक दलाचे (होमगार्ड) जवान रस्त्यावर उतरून आपली कर्तव्ये चोख बजावत आहेत. या कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत, त्यांना कडक उन्हापासून थोडा दिलासा मिळावा यासाठी 'पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य' च्या वतीने विशेष उपक्रम राबवून कॅप (टोप्या) वाटप करण्यात आले. पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रवींद्र शिनगारे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची प्रमुख उपस्थिती म्हणून या कौतुकास्पद उपक्रमादरम्यान विविध विभागांतील पोलीस अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने: प्रवीणकुमार बांगर (पोलीस निरीक्षक, पोलीस अधीक्षक

कार्यालय नियंत्रण कक्ष) श्री. राठोड (पोलीस निरीक्षक)सुरेंद्रसिंग जेव्हेरी (प्रमुख, गृहरक्षक दल) सुमित आठवले (शहराध्यक्ष, पोलीस बॉईज असोसिएशन) वाहतूक नियंत्रण शाखा, पोलीस नियंत्रण कक्ष यांसह विविध नाक्यांवर तैनात असलेले पोलीस कर्मचारी, महिला पोलीस कर्मचारी आणि गृहरक्षक दलाच्या जवानांना या कॅपचे वाटप करण्यात आले. शहरातील वेगवेगळ्या भागांत आणि विभागांमध्ये हे वाटप अद्यापही सुरू असून, पोलीस बॉईज असोसिएशनच्या या संवेदनशील उपक्रमाचे पोलीस प्रशासनासह सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे.दिवसरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी उन्हातानात उभे राहणाऱ्या आमच्या पोलीस बांधवांना आणि होमगार्ड्सना या कडक उन्हात थोडा आराम मिळावा, याच भावनेतून आम्ही या कॅपचे वाटप केले आहे.अशी प्रतिक्रिया रवींद्र शिनगारे (राज्य अध्यक्ष, पोलीस बॉईज असोसिएशन) यांनी दिली आहे.



# भव्यतेकडून भुक्कडाकडे

ही नावे पाहा. प्रल्हाद विठ्ठल कुलकर्णी, धनंजय लोखंडे, शुभम खैरनार, मनोज शिरुरे, मनीषा हवालदार, मनीषा मांढरे, मनीषा वाघमारे आणि अर्थातच शिवराज मोटेगावकर. यात आणखी काही भर पडेलच. या संदर्भात आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे यात एकही उत्तर भारतीय नाही, भय्या नाही आणि मुख्य म्हणजे अलीकडे आपल्या कर्मासाठीही इतरांच्या धर्मास बोल लावणे बहुसंख्यांस आवडते तो अल्पसंख्यही कोणी या यादीत (तूर्त) नाही. तसेच हा लव्ह जिहाद किंवा तत्सम काही नाही. या सर्व व्यक्ती सुशिक्षित मराठी भाषक आहेत. उच्चवर्णीय आहेत आणि उठता-बसता गुरुर्ब्रह्मा गुरूर्विष्णु वगैरे गोडवे गायिले जातात त्या संस्कृतीत शिक्षणासारख्या पवित्र (?) व्यवसायातील आहेत. यातील बहुसंख्य तर पूर्वेकडचे ऑक्सफर्ड अशी उपाधी कौतुकाने ज्या शहरास मिळाली त्या पुणे येथे वास्तव्यास असतात. खरे तर पुण्याशी शिक्षणेतिहासात बरोबरी करणारे शहर भारतात अन्य नसेल. असामान्य प्रतिभेचे कित्येक गणिती, भौतिकशास्त्रज्ञ, वैय्याकरणी, भाषाभ्यासक, समाजशास्त्री, वैज्ञानिक आदींच्या शैक्षणिक आणि वास्तव्याने पुणे शहराची बौद्धिक उंची हेवा वाटावी इतकी वाढली. तथापि हेच पुणे आता शैक्षणिक भ्रष्टाचारासाठी ओळखले जाईल की काय इतके त्या शहराचे स्खलन झाल्याचे दिसते. एके काळी गंभीर अध्ययनासाठी ज्या शहराकडे सर्रास पावले वळायची ते शहर आता भुरट्या शिक्षणचोरांचे माहेरघर होताना दिसते. परंतु यासाठी एकट्या पुणे शहरास बोल लावणे योग्य नाही. ही फक्त पुण्याची शोकांतिका नाही. ही कमी कष्टात बरेच काही मिळवू पाहणार्या आणि पुरेशा गुणवंत गुंतवणुकीआधीच महासत्ता वगैरे बनू पाहणार्या संस्कृतीची शोकांतिका आहे. तीमागील सामाजिक आणि




सांस्कृतिक कारणे लक्षात घेतल्याखेरीज जे काही उघड झाले त्यामागील व्यामिश्रता लक्षात येणार नाही.

आज शिक्षणाबाबत जे भयाण वास्तव समोर येते त्यामागे शिक्षण आणि त्यातही कथित प्रतिष्ठा ज्यातून मिळते असे शिक्षण यास आपल्याकडे मिळालेले अतोनात महत्त्व हे एक कळीचे कारण आहे हे नाकारणे अवघड. शिक्षितांस हे असे महत्त्व आले त्यामागे निवडकांनाच प्रगतीची संधी देणारी आपली जात व्यवस्था. अर्थात त्यावरची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे आणि आता त्याची गरज नाही. कारण हे वास्तव आता सर्वमान्य आहे. तथापि आपल्या रक्तातील या जुन्या जनुकीय वास्तवाचे परिणाम- त्यातही दुष्परिणाम अधिक- आजही दिसतात. त्यावर साधारण पाऊणशे वर्षांपूर्वी एम एन श्रीनिवास यांच्यासारख्या समाजशास्त्रज्ञाचे विश्लेषण सुविख्यात आहे. त्यांनी आपल्या समाजाचे 'संस्कृतायझेशन' होत असल्याचे नमूद केले. म्हणजे समाजातील जे लब्धप्रतिष्ठित आहेत त्यांचे अनुकरण आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या निम्न स्तरावर जगावे लागलेले करू लागतात. शिक्षण आणि आता सर्वदूर इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचा सोस यातून हे वास्तव दिसून येते. अलीकडेपर्यंतच्या आपल्या राज्यकर्त्यांस या वास्तवाची जाण होती. त्यातून उच्च शिक्षणाच्या विविध संस्था आपल्याकडे उभ्या राहिल्या. पण हा वेग लोकशाहीच्या वेगाशी स्पर्धा करू शकला नाही. नंतर अशा शैक्षणिक संस्थात्मक उभारणीत सरकार मागे पडत गेले आणि त्यातून खासगी शिक्षणसम्राटांस हे रान मोकळे करून दिले गेले. वास्तविक प्राथमिक शिक्षण ही जबाबदारी सरकारचीच. तीही सरकारने झटकली. त्यातून एक नवी जात व्यवस्था तयार झाली. 'चांगले' म्हणजे श्रीमंती असा समज सोयीस्कररीत्या निर्माण केला गेला. त्यास बळी पडून अशा शैक्षणिक संस्थांत आपापल्या पाल्यास शिक्षण देऊ शकणारे आई-वडील आणि हे असे काही न झेपल्यामुळे नगरपालिकेच्या वा सरकारी शाळांत आपल्या मुलाबाळांस पाठवणारे असा हा दुभंग. तो तसा आरोग्याप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रातही तयार झाला. याच्या जोडीने आपल्या संस्कृतीने श्रमशक्तीस कधीच महत्त्व दिले नाही. श्रमाची कामे करणारे कितीही कौशल्यवान असले तरी निर्बुद्ध आणि ती न करणारे तेवढे प्रबुद्ध अशीच आपली सांस्कृतिक मांडणी. त्यामुळे अशी कामे टाळून अधिक उच्च पदवीची व्यवस्था आपापल्या पोराबाळांसाठी करणे हेच कथित मध्यमवर्गाचे ध्येय बनले.

सेवा क्षेत्राच्या विस्तारामुळे हा मध्यमवर्ग फोफावला आणि परिणामी या स्वप्नानेही हात-पाय पसरले. वास्तव हे की या सेवा क्षेत्रातील अनेक जण हे फक्त संगणक-ज्ञानी कारकून. आणि चार दिडक्या मिळवणारे कारकूनही 'व्हाइट कॉलर' वर्गात. वैद्यक/ शल्यक वा अभियंता होण्यास आवश्यक पात्रता (बुद्धिमत्ता नव्हे) आपल्या मुला/ मुलीच्या ठायी नाही हे सत्य 'काहीही खरेदी करता येते' अशी विचारधारा गोंजारणार्या नवमध्यमवर्गास अजिबात मान्यच नसते. त्यामागेही कारण आहे. या नवमध्यमवर्गीयांनी 'गुणवत्ता' कशी खरेदी करता येते ते आपापल्या खासगी आस्थापनांत पाहिलेले असते. नियम तोडणे वा त्यास बगल देणे,  कमअस्सल हे सर्रास अस्सल म्हणून विकणे, व्यवस्थेस 'मॅनेज' करणे हे ज्याच्या व्यावसायिक आयुष्याचा भाग असते ते ही व्यक्ती त्याच्या खासगी आयुष्यातही करणार हे उघड आहे. प्रश्नपत्रिका विकत घेण्याचा निर्लज्जपणा हेच नवमध्यमवर्गीय सहज करतात त्यामागील कारणांची पार्श्वभूमी ही. नियमांचे पालन करणारी, गुणवत्तेचा आदर करणारी, सभ्यता म्हणजे नामर्दपणा नाही असे मानणारी समाज व्यवस्थाच ज्यांना माहिती नाही त्यांना परीक्षेआधी प्रश्नपत्रिका फोडणे गैर आहे हे वाटणारच कसे? समजा ते तसे वाटले तरी असे गैरकृत्य केलेल्यांस शासन होईलच याचीही शाश्वती नाही. म्हणजे आपला पोटचा गोळा या अशा गैरमार्गाने पुढे जाणार्यांच्या स्पर्धेत मागे पडणार हेच जर पाहणे या नवमध्यमवर्गीय पालकांचे भागधेय असेल तर आज ना उद्या त्यांनाही या गैरकृत्यांत हात मारून घेण्याचा मोह होणे नैसर्गिक. शिवाय तसे करणे आर्थिकदृष्ट्याही फायद्याचे. भ्रष्ट मार्गानेच उभ्या राहिलेल्या खासगी शैक्षणिक संस्थातून आपल्या पाल्यावर वैद्यकीय शिक्षणासाठी २५-३० लाख रु. खर्च करण्यापेक्षा फुटणार्या प्रश्नपत्रिकेसाठी १० लाख रु. मोजणे केव्हाही फायद्याचे. आज आपल्या मुली/ मुलास डॉक्टर बनवू पाहणारे हाच विचार करतात. याचा अर्थ असा की सामान्य नागरिकासमोर असतात ते दोनच पर्याय : कमी खर्चाचा भ्रष्टाचार निवडायचा की अधिक खर्चाचा? पेपर फोडण्यासाठी पैसे मोजणे हाही भ्रष्टाचार आणि खासगी संस्थात वैद्यकीय पदवीसाठी खर्च करणे म्हणजे भ्रष्ट शिक्षणसम्राटाच्या भ्रष्ट संपत्तीत भर घालणे- म्हणजे तोही भ्रष्टाचारच. अशा परिस्थितीत पालक कमी खर्चाचा भ्रष्टाचार निवडणार हे कोणाही किमान अक्कल असलेल्यांसही कळेल. तेव्हा जे काही सुरू आहे त्याचे मूळ या किडलेल्या व्यवस्थेत आहे.  ज्यांना विकसित जगात स्थलांतराचा पर्याय आहे ते देश त्यागून येथील किडकी व्यवस्था टाळतात. ज्यांना ते शक्य नाही ते जमेल त्या मार्गाने जमेल ते 'मॅनेज' करणे शिकत येथे तगून राहतात. परत विदेशी जाण्याचा पर्याय दोन वर्गास उपलब्ध असतो. खरे उच्चगुणवंत आणि दुसरे आर्थिक क्षमता असलेले. परिणामी पहिल्या वर्गात नसलेले दुसर्या गटात तरी आपणास कसे सहभागी होता येईल या प्रयत्नात लागतात. गुणवान निर्माण करून त्यांना मोकळे वाढू देण्यापेक्षा नापास होणार्यांना वाईट वाटू नये म्हणून सगळ्यांनाच वरच्या वर्गात ढकलणे ज्या समाजात घडते त्या समाजात गुणवान निपजणे आणि निपजले तरी टिकणे अशक्य. हे आपण मान्य करून प्रामाणिक सुधारणा जोवर करत नाही तोवर आपला प्रवास 'भव्यतेकडून भुक्कडाकडे'-  असाच राहणार.

## पान १ आणि ४ वरुन...

**मध्यरात्री तोडगा...**

यांनी मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत नेहमीच पुढाकार घेतला असून मान्य करण्यात आलेल्या मुद्द्यांवर पुढील दोन ते तीन दिवसांत आवश्यक आदेश काढले जातील. मनोज जरांगे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचे सरकारच्यावतीने आभार मानणारी पोस्ट विखे पाटील यांनी केली.उपोषण मागे घेतल्याने सध्या आंदोलनाला विराम मिळाला असला, तरी सरकारकडून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी कितपत होते, यावर पुढील भूमिका ठरणार असल्याचे मराठा आंदोलकांकडून सांगितले जात आहे.

**खुनाच्या प्रयत्ना प्रकरणी...**

गंभीर मारहाण आणि पीडितास धमकावण्यासारख्या गंभीर आरोपांमध्ये न्यायालयाने कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येते. आरोपींची संभाव्य दहशत, पीडिताच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि तपास प्रक्रियेवर होणारा परिणाम यांचा विचार करून दिलेला हा आदेश कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे. फिर्यादीच्या वतीने ॲड. अविनाश गंडले यांनी सखोल अभ्यास करून न्यायालयासमोर प्रभावी युक्तिवाद मांडला. ॲड.राजेश शिंदे यांनी कायदेशीर बाबी तसेच पुरावे एकत्रित करून महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. ॲड.अविनाश गंडले यांना या कामी ॲड. ईमरान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड.सुरक्षा जावळे, ॲड.किरण मस्के, ॲड.राजेश शिंदे, ॲड.सचिन गिरी, ॲड.शुभम सरवदे, ॲड.अनिकेत गंडले, ॲड.रवींद्र बरडे यांनी सहकार्य केले.

**गेवराई पोलिसांनी अवैध...**

तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९५७ च्या कलम ४(२१) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. अवैध वाळू उपशाविरोधातील कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**बीडच्या मोमीनपुरा...**

मंजूर केला. या प्रकरणात ॲड. अविनाश गंडले यांना ॲड. ईमरान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. किरण मस्के, ॲड. राजेश शिंदे, ॲड. सचिन गिरी, ॲड. शुभम सरवदे, ॲड. अनिकेत गंडले व ॲड. रवींद्र बरडे यांनी सहकार्य केले. बोलीभाषेतील पर्यायी मथळे : मोमीनपुरा गोहत्याप्रकरणातील चौघांना कोर्टातून दिलासा; जामीन मंजूर ॲड. अविनाश गंडले यांच्या युक्तिवादाची कमाल; चार आरोपींची जामिनावर सुटका पेठ बीडच्या गाजलेल्या प्रकरणात चौघांना मिळाला जामीन गोहत्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपींना न्यायालयाचा दिलासा कोर्टात गंडले यांचा दमदार युक्तिवाद; चौघांना मिळाला जामीन

**शिवसंवाद दौर्यातील...**

एका दुःखी कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांनी संवेदनशील नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला. डॉ. शिंदे यांच्यात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे संस्कार स्पष्टपणे दिसून आले. शिवसेनेची माणुसकीची परंपरा त्यांनी कृतीतून जपली आहे. त्यांच्या या मदतीमुळे सय्यद कुटुंबाला मोठा आधार मिळाला. समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि आपुलकी त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केली. अशा नेतृत्वामुळे सामान्य माणसाचा राजकारणावरील विश्वास अधिक दृढ होतो. असे मत शिवसेना-युवसेनेच्या वतीने बीड जिल्हा संपर्काप्रमुख मनोज शिंदे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर, युवा सेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त करत डॉ. श्रीकांत शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**मेलोडी चॉकलेट वाटून...**

तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी महागाईची मेलोडी जनता ऐकत नाही असा उपरोधिक संदेश देत नागरिकांना मेलोडी चॉकलेटचे वाटप केले. या आंदोलनात बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, गणेश बेगुमान आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पंपावर आंदोलन झाल्यानंतर आंदोलकांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन विविध मागण्याचे निवेदन दिले.

**राज्यस्तरीय खो-खो...**

सावंत,(न्यू हायस्कूल गेवराई ) माऊली चोरमले( द.बा.घुमरे वि.गेवराई) आकाश उकांडे,हर्षद हंबर्डे, शंभुराज नलावडे,वैभव शेळके, सार्थक धस,(निवृत्तीराव धस वि.जा.आष्टी)सचिन भांडवले,हरिओम मांडवे(सैनिकी वि.बीड) प्रशिक्षक - नवनाथ चव्हाण व्यवस्थापक-भरत यादव मुलीचा संघ कर्णधार अक्षरा चोले, थापडे संपदा, थापडे भक्ती, बोरगे नंदिनी, येवले कीर्ती, शिवनगे सानिका, शेलकर अक्षरा, (राजर्षी शाहू कन्या वि. बीड) श्रद्धा करे, ममता अंधारे (न्यू हायस्कूल गेवराई) प्रतीक्षा येवले ( र. भ अट्टल कॉलेज गेवराई) यज्ञा काळे (शिवाजी वि. बीड) कोल्हे सोनाली (सिंदफणा वि.शिरूर) समृद्धी घोलप (सेंट झेविस गेवराई) नाईक नवरे दुर्गा (माजलगाव) प्रशिक्षक - तुकाराम करंडे व्यवस्थापिका-रोहिणी देवगूडे या दोन्ही संघांना शुभेच्छा देण्यासाठी मा.पृथ्वीराजे पंडित, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा.जे.पी शेळके मा. रमेश भाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी समितीचे सदस्य प्रा.राजेंद्र बरकसे, बापुसाहेब तारूकर, एमॅच्युअर खो-खो असोसिएशनचे सचिव विजय जाहेर, रविंद्र खरात, रमेश पिसाळ, महेश वायभसे या सर्वांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**राजमाता अहिल्याबाई होळकर...**

बांधिलकी समजून रक्तदान केले त्यांच्या या कार्याची दखल घेत या सुरक्षा गार्ड व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला सदर वेळी  अधिष्ठता डॉ शंकर धपाटे ,उपअधिष्ठता डॉ राजेश कचरे, वैद्यकीयअधीक्षक प्रोफेसर डॉ राकेश जाधव , सुप्रसिद्ध चेस्ट विकार तज्ञ, दमा स्पेशलिस्ट प्रोफेसर डॉ अनिल मस्के, रात्र असो की दिवस कोणत्याही वेळेला रुग्णासाठी धावून येणारे उप अधीक्षक डॉ नागेश अब्दागिरी , रुग्णालयाच्या मेट्रन मॅडम कल्पना कुडमुदकर, सुरक्षा विभागाचे प्रमुख भगवान शिकाळेकर आणि एस एस ओ अभिमन्यू साळुंखे  व इतर मान्यवर उपस्थित होते.  अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त रक्तदान करणारे सुरक्षारक्षक रक्तदाते मोहन मंडोळे, सौदागर घुगे ,शंभू रिड्डे, यशपाल धनसडे, परसराम भारती ,उमर शेख ,प्रदीप कुडके ओमकार दराडे ,अशोक बारगजे ,काशिनाथ गडदे अमोल ,कागणे संतोष ,शिरामे प्रदीप पवार, नाथा ताळे,श्रीराम साबळे ,दत्ता मुसळे, उमरखानराज पठाण ,ऋषिकेश कलढोण ,उत्तरेश्वर मस्के प्रदीप ,बांगर सिद्धेश्वर ,प्रताप राठोड, सहदेव पांचाळ ,कांचन करपे यांनी रक्तदान करून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात मोठे योगदान दिले आहे.

**पोलिसांना आणि होमगार्ड्सना...**

असून अनेक लाभार्थ्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. लाभार्थ्यांनी शासन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच गेवराई तहसील प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. महसूल मंत्री बावनकुळे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या योजनेची गेवराई तालुक्यात यशस्वी अंमलबजावणी होत असल्याने ती सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरत असून प्रशासनाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.




# राजकीय पटावरचा शांत रणनीतीकार : अमरसिंह पंडित



**बीड जिल्ह्याच्या राजकारणात अनेक चेहरे आले, अनेक वादळं उठली, अनेक समीकरणं बदलली पण काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात, जी काळाच्या प्रत्येक वळणावर स्वतःचा ठसा उमटवत राहतात. अमरसिंह पंडित हे त्यापैकीच एक नाव. गेवराईच्या मातीतून उभा राहिलेला हा नेता आज केवळ राजकारणी म्हणून ओळखला जात नाही, तर राजकीय डावपेच, संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांवरील पकड आणि परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची क्षमता यामुळे अनेकजण त्यांना राजकारणातील मास्टर माईंड म्हणून संबोधतात.**

राजकारणात फक्त पद मिळवणं मोठं नसतं; तर लोकांच्या मनात जागा निर्माण करणं मोठं असतं. भैय्यासाहेबांनी ही जागा आपल्या स्वभावाने, जिद्दीने आणि लोकांशी जोडलेल्या नात्याने निर्माण केली. गावागावातील सामान्य कार्यकर्त्यापासून ते मोठ्या राजकीय व्यासपीठापर्यंत त्यांनी आपली स्वतंत्र ओळख कायम ठेवली. बीड जिल्ह्याचं राजकारण नेहमीच संघर्षमय राहिलं. आरोप-प्रत्यारोप, राजकीय स्पर्धा, बदलती समीकरणं आणि अनेक आव्हानं या सगळ्यात स्वतःचा प्रभाव कायम ठेवणं ही सोपी गोष्ट नाही. पण प्रत्येक संकटानंतर अधिक ताकदीने उभं राहण्याची कला अमरसिंह पंडित यांनी दाखवून दिली. म्हणूनच त्यांच्या राजकीय प्रवासाकडे केवळ निवडणुकीच्या गणितातून पाहता येत नाही; तो अभ्यासाचा विषय ठरतो.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी ताकद म्हणजे माणसं जोडण्याची कला. राजकारणात अनेक नेते भेटतात; पण कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात उभा राहणारा नेता विरळाच असतो. एखाद्या कार्यकर्त्याच्या घरीचा कार्यक्रम असो, शेतकऱ्याचा प्रश्न असो किंवा युवकांच्या अपेक्षा असोत भैय्यासाहेब प्रत्येक ठिकाणी आपली उपस्थिती जाणवून देतात. त्यामुळेच त्यांच्यावर प्रेम करणारा वर्ग आजही मोठा आहे. त्यांच्या नेतृत्वात विकासाच्या प्रश्नांनाही प्राधान्य मिळालं. स्थानिक पातळीवरील प्रश्न, पाणी, रस्ते, सहकार आणि युवकांना संधी या विषयांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. राजकारण म्हणजे केवळ भाषणं नसतात, तर समाजाशी जोडलेली जबाबदारी असते, याची जाणीव त्यांच्या कार्यपद्धतीत दिसून येते. आजच्या वेगाने बदलणाऱ्या राजकारणात अनेक चेहरे येतात आणि जातात. पण काही नावं काळाच्या पुढे जाऊन ओळख निर्माण करतात. अमरसिंह पंडित हे असंच एक व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांनी राजकीय चातुर्य आणि माणुसकी यांचा अनोखा संगम घडवला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी आयुष्य, दीर्घ राजकीय कारकीर्द आणि जनसेवेची अधिक ताकद लाभो, हीच जनतेच्या मनातील भावना राजकारणात अनेक खेळाडू असतात पण डावपेच आखणारा 'मास्टर माईंड' विरळाच असतो!

# दादांच्या लाडक्या आमदारांनी जागवल्या अविस्मरणीय आठवणी

## अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प



**बीड । प्रतिनिधी**

**पहिल्यांदाच आमदार झालो...वैधानिक पदावर कसे काम करायचे... सभागृहात कसे बसायचे... कसे बोलायचे.. समाजात वागताना सुध्दा तुमच्याकडे महाराष्ट्र पहात असतो याचे भान कसे ठेवायचे... हे सर्व काही दादांनी मला शिकवले. परंतु गुरुंचा सहवास फक्त दिड वर्ष मिळाला. या काळात जे दादांकडून शिकायला मिळाले त्या सर्व गोष्टी आचरणात आणून दादांनी दाखवलेल्या मार्गावर आता चालत राहणार आहे. दादांची जागा सुनेत्राताई वहिनींनी घेतल्यामुळे आता त्यांचे हात बळकट करण्यासाठी पहिल्यापेक्षा अधिक जोमाने काम करणार असल्याचे प्रतिपादन गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी केले. दादांच्या लाडक्या आमदारांनी अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प अर्पण करताना अनेक अविस्मरणीय आठवणी जागवल्या. त्या ऐकताना सभागृह स्तब्ध झाले होते.**



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने सुरु केलेल्या अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे सत्र दि.२८ मे रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमाला आ.विजयसिंह पंडित यांच्यासह जेष्ठ नेते मोईन मास्टर,प्रसिध्द सर्जन डॉ.अनिल बारकुल,अॅग्रो इनपुट डिलर असोसिएशन नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री, जेष्ठ विधीज्ञ अॅड.राम औटे, संपादक राजेंद्र होळकर,उप अभियंता महेंद्र निकम,न.प.सभापती बाळासाहेब गुंजाळ, न.प.सभापती रणजीत बनसोडे, जेष्ठ नगरसेवक भीमराव वाघचौरे, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक महेश धांडे, जेष्ठ उद्योजक सुशिल खटोड,अभिनेत्री शोभा सिरसाट,जेष्ठ पत्रकार जगदिश पिंगळे, जेष्ठ संपादक वैभव स्वामी आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जनसामान्यांच्या मनात आजही अजित दादांचे कार्य, त्यांचे विचार जिवंत आहेत.चंद्र-सुर्य असे पर्यंत दादांची किर्ती दिगंत राहिल. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने व्याख्यानमालेचा उपक्रम सुरु केल्याबद्दल आ.पंडित यांनी वसंत मुंडे आणि संतोष मानूरकर यांचे विशेष कौतुक केले. दादांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देताना आ.पंडित यांनी विधीमंडळात दादांकडून मिळालेले मार्गदर्शन खुप महत्वाचे होते. त्यांच्यामुळेच मला सातत्याने सभागृहात बोलण्याची संधी मिळाली. सभागृहातील त्यांची अभ्यासपुर्ण मांडणी, निर्णय क्षमता, कार्यकर्त्या प्रती असलेली आत्मीयता आणि जनतेच्या प्रश्ना विषयीची संवेदनशिलता. हे दादांचे सर्व गुण आचरणात आणण्यासारखे आहेत.दादांचे मार्गदर्शन अनेक वर्ष मिळत राहिल या भावनेतून काम करत असताना अचानक झालेले दादांचे निधन ही कधीच भरुन न येणारी क्षती आहे.सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाला बळ देत दादांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचे आ.पंडित म्हणाले. या प्रसंगी उपस्थित सर्व पाहुण्यांनी स्व.अजित दादांच्या नेतृत्व गुणांविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आम्रपाली साबळे यांनी केले. स्व.अजित दादांच्या लाडक्या बहिणींना या प्रसंगी रणरागिनी सेवाभावी संस्थेच्या वतीने साड्यांचे वाटप करण्यात आले. समारंभाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले.

नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणारे

# पाणी आष्टी,पाटोदा, शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे



## माजी आ. भीमराव धोंडे व माजी आ. बाळासाहेब आजबे यांची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी आष्टी पाटोदा शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी आ. भीमराव धोंडे आणि माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी शिष्टमंडळा मार्फत जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे निवेदनाव्दारे केली. याबाबत अधिक माहिती अशी की, माजी आ.भीमराव धोंडे व माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्यासह शिष्टमंडळात १०० पेक्षा जास्त शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. नाशिकचे विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील आष्टी,पाटोदा व शिरूर (कासार) तालुके मराठवाड्यातील अतिशय अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष निर्माण होते. परिणामी येथील नागरिकांना पिण्याच्या व शेती पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. रोजगाराच्या अभावामुळे अनेकांना ऊसतोड व इतर कामांसाठी स्थलांतर करावे लागते. या भागात जानेवारी महिन्यापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे येथील जनतेचे जीवनमान अत्यंत कठीण बनले आहे. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी देखील समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त भागांना उपलब्ध करून देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.त्या अनुषंगाने समुद्रात वाहून जाणारे पाणी या तीन तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रात नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मिळाल्यास दुष्काळी भागातील जवळपास २०० गावांना याचा फायदा होईल. यावेळी तालुक्यातील दुष्काळी भागाला समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांनी दिले. या शिष्ट मंडळामध्ये काकासाहेब शिंदे, दीपक घुमरे, विश्वास नागरगोजे, नियामत बेग, रत्नदीप निकाळजे, अशोक साळवे, भाऊसाहेब लटपटे, पांडुरंग नागरगोजे, रामराव खेडकर, दादासाहेब जगताप,उत्तम बोडखे,सतिशमामा झगडे,झुंबर चव्हाण,बजरंग कर्डीले,उद्धव विधाते,शहादेव गर्जे,बाबासाहेब वाघुले,केशव शिंदे, अशोक खेडकर, अंकुश मुंढे,संतोष गोल्हार,शहादेव गर्जे,सुरेश माळी, महादेव दानवे, चेअरमन राजाराम ननवरे,हरिभाऊ जंजिरे,पांडुरंग गावडे,नानाभाऊ वाडेकर,विठ्ठल लांडगे,दिपक घुमरे, बाबुराव जाधव, अनिल जायभाय, बाळासाहेब शेकडे, संदीप नागरगोजे, सागर वनवे,शाम हुले,तात्यासाहेब लाड,सचिन जायभाय,भागवत वारे,सावळेराम जायभाय, अभिलाश गाडैकर , वैभव बडे,महारूद्र खेडकर,डॉ.प्रभाकर कवठेकर,कचरू काळे,तात्यासाहेब लाड आणि शिवाजी थोरवे आदींचा समावेश आहे.

# कपिलधार येथे परम् रहस्य ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन

## संत मनमथ स्वामी यांच्या ४२६ व्या ग्रंथ स्मरणार्थ एक जून रोजी एकदिवसीय धार्मिक कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांनी लिहिलेल्या पवित्र 'परम् रहस्य' ग्रंथाच्या ४२६ व्या स्मरणार्थ श्रीक्षेत्र कपिलधार येथे रविवार, दि. १ जून रोजी एकदिवसीय भव्य पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक या सोहळ्यास उपस्थित राहणार असून विविध भागांतून अनेक शिवाचार्य यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला धार्मिक व अध्यात्मिक महत्त्व अधिक वाढले आहे.लिंगायत समाजामध्ये अत्यंत श्रद्धेचा विषय असलेला 'परम् रहस्य' हा ग्रंथ संत मन्मथ स्वामी यांनी रचला असून या ग्रंथामध्ये ईश्वरभक्ती, जीवनमूल्ये, अध्यात्म, तसेच महादेवाच्या महात्म्याचे सखोल व तत्त्वज्ञानात्मक विवेचन करण्यात आले आहे. त्यामुळे हा ग्रंथ समाजात अत्यंत पवित्र आणि मार्गदर्शक मानला जातो. कार्यक्रमाची सुरुवात



सकाळी ८ वाजता ध्वजपूजन व महाआरतीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या संपूर्ण कालावधीत सामूहिक 'परम् रहस्य' ग्रंथ पारायण, प्रवचन, तसेच कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर भक्तिगीत, आध्यात्मिक मार्गदर्शन व संतवचनांमुळे परिसरात अखंड भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाची सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा सोहळा समस्थ वीरशैव लिंगायत समाज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, निवास, स्वच्छता, सुरक्षा तसेच आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या पारायण सोहळ्यास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाटोदा तालुक्यात पांदण रस्त्यांच्या कामात मोठा भ्रष्टाचार?

## वंचित बहुजन आघाडीचा ४ जून रोजी 'कुलूप ठोक' आंदोलनाचा इशारा

**पाटोदा । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी ने पाटोदा तालुक्यात सुरू असलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, बोगसगिरी आणि निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन विलास मेघडबर आणि माजी तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी पंचायत समिती पाटोदा येथील गट विकास अधिकारी (BDO) यांना लेखी निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवेदनानुसार, तालुक्यातील अनेक पांदण रस्त्यांची कामे नियमबाह्य पद्धतीने आणि अत्यंत निकृष्ट दर्जाची सुरू आहेत. प्रत्यक्ष कामावर मजूर उपस्थित नसतानाही त्यांच्या बोगस हजेऱ्या दाखवण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बनावट (Duplicate) जीएसटी बिले जोडून शासनाची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. याशिवाय, या कथित भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना काही ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांकडून दमदाटी आणि मारहाण केली जात असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा प्रवृत्तीला बळ मिळत असून कार्यकर्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे वंचित बहुजन आघाडीने म्हटले आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, यापूर्वीही दोन ते तीन वेळा लेखी तक्रारी देण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामांची बिले अदा करू नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने तातडीने दखल घेत कारवाई न केल्यास, येत्या ४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती पाटोदा कार्यालयासमोर 'कुलूप ठोक' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीने दिला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय बीड, तहसील कार्यालय पाटोदा आणि पाटोदा पोलीस स्टेशन यांनाही पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# आमदार विवेक कोल्हे यांचा सासुरवाडी नांदरमध्ये सत्कार



**पाचोड । प्रतिनिधी**

समस्त पंचक्रोशीच्या वतीने दिनांक २६ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थित राहिलो. श्रीक्षेत्र नांदर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या शुभेच्छा, प्रेम आणि सन्मानाबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. या प्रवासात लाभलेला आपल्या सर्वांचा आशीर्वाद, विश्वास आणि साथ हीच माझी खरी ताकद असल्याची भावना यावेळी व्यक्त केली. जनतेने दाखवलेले प्रेम आणि दिलेला सन्मान हीच पुढील काळात समाजहित, शेतकरी, युवक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा आहे. याप्रसंगी आ.श्री.विलास बापू भुमरे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष मा.श्री बिपिनदादा शंकरराव कोल्हे श्री रवींद्र शिवाजीराव काळे श्री भूषण कावसानकर नगराध्यक्ष पैठण , श्री विनोद बोंबले पं. समिती सभापती पैठण, श्री नंदू आणा काळे , श्री तुषार पा. शिसोदे , श्री नंदू पा. पठाडे ,श्री अभिजित तवार - जि प सदस्य, श्री शिवराज भुमरे - जि. प सदस्य ,श्री राजेंद्र वाघमोडे जि. प सदस्य, श्री कारभारी लोहकरे - जि प सदस्य, श्री सतिष बलदवा , बाबुराव पडुळे - सभापती खरेदी विक्री संघ पैठण,श्री रवींद्र पा. शिसोदे ,कल्याण बरकसे , श्री संजय पापडीवाल , श्री सुनील बलदवा , श्री महेश जोशी , श्री रमेश खांडेकर , श्री महंमद हनीफ , श्री मुस्ताक पठाण , श्री रमजु चरणीय, श्री अनिल हजारे , श्री बंडू गाढे , श्री माऊली मुळे , श्री शाम तांगडे , श्री डी के जाधव, श्री हझमुद्दीन कटारे नगरसेवक पैठण , श्री गोवर्धन टाक नगरसेवक, श्री रामचंद्र शिवाजीराव काळे, श्री मित्रवर्धन रवींद्र काळे, श्री उदयसेन रामचंद्र काळे, श्री पुष्कराज रामचंद्र काळे. श्रीक्षेत्र नांदर येथील समस्त ग्रामस्थ, आयोजक आणि उपस्थित मान्यवरांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार!

# महिला पत्रकार संघ जिल्हाध्यक्षपदी साबळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ संलग्न बीड जिल्हा महिला पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नुकताच आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते त्यांचा या नियुक्तीबद्दल सत्कार करण्यात आला. आम्रपाली साबळे या सामाजिक कार्यासोबतच पत्रकारीतेत सुध्दा कार्यरत आहेत. सोशल मिडियाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नावर आवाज उठवला आहे. फेसबुक,इन्टाग्रामच्या माध्यमातून त्यांचे कार्य देशभरातील असंख्य जनते पर्यंत पोहचले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि जिल्हाध्यक्ष संतोष मानूरकर यांनी त्यांची महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. साबळे यांनी रणरागिनी सेवाभावी संस्थेची सुध्दा स्थापना केली असून राज्यभरात या संस्थेचे कार्य सुरु झाले आहे. महिला पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



दै.बीड सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
सोमवार दि. ०१ जून, २०२६ पान- ४
Happy Morning

# शिवसंवाद दौऱ्यातील माणुसकीचा स्पर्श!; दु:खाच्या डोंगराखाली दबलेल्या सय्यद कुटुंबाला खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा आधार

**केज । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या रखरखत्या उन्हात शिवसेनेचा 'शिवसंवाद दौरा' सुरू आहे. अंगाची लाही-लाही करणाऱ्या उष्णतेची पर्वा न करता खासदार डॉ. श्रीकांत शिंदे राज्यभरातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. शाखाप्रमुखांपासून ते जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांच्याशी भावनिक नाते जोडणे, हा या दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे.**

अशाच दौऱ्यादरम्यान गुरुवारी केज येथे आयोजित आढावा बैठकीत एक हृदयद्रावक घटना घडली. रसूल गफूर सय्यद हे आपल्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटाबाबत निवेदन देण्यासाठी बैठकीच्या ठिकाणी आले होते. काही दिवसांपूर्वीच त्यांच्या मुलाचे निधन झाल्याने कुटुंब आधीच मोठ्या दुःखातून जात होते. त्या वेदनेतून मार्ग शोधण्यासाठी ते आशेने आले होते. मात्र नियतीने वेगळाच घात केला. बैठकीपूर्वीच त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. उपस्थितांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी डॉ. श्रीकांत शिंदे यांना परिस्थितीची कल्पना दिली. पुढील कार्यक्रमांचे नियोजन, दौऱ्याची व्यस्तता आणि राजकीय जबाबदाऱ्या बाजूला ठेवत डॉ. शिंदे यांनी थेट सय्यद कुटुंबाच्या घरी जाण्याचा निर्णय घेतला. घरात शोककळा पसरली होती. काही दिवसांतच मुलगा आणि आता कुटुंबप्रमुख अशा दुहेरी आघाताने कुटुंब पूर्णपणे खचले होते. अशा कठीण प्रसंगी डॉ. शिंदे यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला आणि त्यांच्या दुःखात सहभागी झाले. केवळ सांत्वन करून न थांबता त्यांनी सय्यद कुटुंबासाठी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. यासोबतच कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही शिवसेना उचलेल, अशी आश्वासक ग्वाही दिली.

दुःखाच्या काळोखात आशेचा किरण ठरलेल्या या मदतीमुळे कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण त्या अश्रूंमध्ये आधार मिळाल्याची भावना देखील होती. मराठवाड्याच्या तप्त भूमीवर सुरू असलेल्या शिवसंवाद दौऱ्यातील हा प्रसंग केवळ एका राजकीय नेत्याच्या भेटीचा नव्हता; तो माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचा जिवंत अनुभव होता. कारण नेतृत्वाची खरी ओळख व्यासपीठावरील भाषणांतून नव्हे, तर संकटाच्या क्षणी दुःखी माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यातून होत असते.



पक्ष, राजकारण, स्वार्थ आणि उर्वरित दौऱ्यातील बैठका बाजूला सारून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सय्यद कुटुंबाच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली आणि मदतीचा हात दिला. त्यांच्या या कृतीतून बीड जिल्हावासियांना माणुसकीचे विराट दर्शन घडले. संकटाच्या काळात » पान २ वर

# अनेक वर्षांपासून प्रलंबित चौसाळा ते वाढवणा रस्त्याचा प्रश्न मार्गी : अशोक लोढा

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून प्रलंबित चौसाळा ते वाढवणा रस्त्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मार्गी लागला आहे. चौसाळा ते वाढवणा रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत चालू आहे. सदरील कामाची चौसाळा सर्कलचे जि.प.सदस्य तथा भाजपा बीड शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी प्रत्यक्ष पहाणी करून सुरू असलेल्या रस्त्याचे काम निष्कृष्ट पद्धतीने चालू आहे असे लक्षात येताच तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून योग्य त्या सूचना दिल्या.

चौसाळा ते वाढवणा रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली होती त्यामुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता ही बाब लक्षात घेऊन पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत अशोक लोढा यांनी मा.ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून चौसाळा ते वाढवणा रस्ता मंजूर करण्यात आला होता. रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली यामुळे नागरिकांचे हाल, पावसाळ्यात तर जास्तच विदारक परस्थिती होते याची जाणीव अशोक लोढा यांना असल्यामुळे पावसाळ्यापूर्वी हा उत्तम दर्जाचा रस्ता तयार व्हावा या साठी प्रयत्न करत आहेत. या रस्त्याचे काम निष्कृट दर्जाचे चालू आहे. अशी तक्रार वाढवणा आणि पिंपळगाव घाट येथील ग्रामस्थांनी अशोक लोढा यांच्या कडे केली. या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेत ग्रामस्थांच्या उपस्थित रस्त्याच्या कामाची पाहणी केली. हा रस्ता अत्यंत दर्जेदार आणि मजबूत झाला पाहिजे तसेच जनतेच्या कामात कसलीही तडजोड किंवा हयगय खपवून घेतली जाणार नाही. अशी स्पष्ट व ठाम भूमिका घेत संबंधित अधिकारी श्री. जोगदंड साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा करून उत्तम दर्जाचा रस्ता करा अशा सक्त सूचना दिल्या. चौसाळा ते वाढवणा रस्ता पूर्ण झाल्यानंतर माळेवाडी,रुई गव्हाण, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा ग्रामस्थांचा दळणवळणाचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटणार आहे. जनतेच्या हक्काच्या विकास कामांमध्ये कसलीही कुचराई होऊ न देणे आणि गावखेड्याचा शाश्वत विकास करणे हेच आपले ध्येय, कर्तव्य आहे अशी भावना अशोक लोढा यांनी व्यक्त केली आहे.





बीड - अप्पर पोलीस अधीक्षक बीडपदी पदभार स्वीकारल्यानंतर मा.समीर शेख यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार करताना युवासेना कार्यकारणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल पिंगळे.

# खुनाच्या प्रयत्ना प्रकरणी चार आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळला : अ‍ॅड. अविनाश गंडले

## अ‍ॅड.राजेश शिंदे यांनी बजावली महत्त्वपूर्ण भूमिका

**बीड । प्रतिनिधी**

प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी की, गु.र.क्र.१९७/२०२६ मध्ये फिर्यादी संदीप कैलास कोकणे (रा. धोंडराई, ता. गेवराई) यांच्यावर आरोपींनी जीवघेणा हल्ला करून गंभीर मारहाण केली होती. या हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला तब्बल २४ टाके पडले असून त्यांच्यावर रुग्णालयात मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. गेवराई पोलीस ठाणे हद्दीतील खुनाचा प्रयत्न व गंभीर मारहाण प्रकरणातील चार आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. तदर्थ प्रथम जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी फेटाळून लावला आहे. या आदेशामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये न्यायालय आरोपींच्या वर्तनाची आणि गुन्ह्याच्या परिणामांची गांभीर्याने दखल घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील आरोपी देविदास लक्ष्मण प्रधान, बाळा उर्फ अजिनाथ प्रकाश प्रधान, संदीप राम प्रधान आणि पंढरीनाथ मधुकर प्रधान यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. यावेळी आरोपींची गुन्हेगारी प्रवृत्ती, फिर्यादीला दिलेल्या कथित जीवे मारण्याच्या धमक्या, तसेच आरोपी फरार असतानाही त्यांच्याविरोधात प्रभावी कारवाई न झाल्याच्या बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. आरोपींना जामीन मंजूर झाल्यास फिर्यादीच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, तसेच साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता असल्याचेही मांडण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे विचारात घेतल्यानंतर मा. प्रथम तदर्थ जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी चारही आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. या आदेशामुळे खुनाचा प्रयत्न, » पान २ वर

# गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला



**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई करत ट्रॅक्टर व ट्रॉलीसह तब्बल ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी त्यांच्या पथकासह ही कारवाई केली. २९ मे रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास गेवराई शहर हद्दीतील हिंगणगाव रस्त्यावरून एक ट्रॅक्टर अवैधरित्या वाळू वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संबंधित ट्रॅक्टर अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र चालक वाहन सोडून घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी महिंद डी आय ट्रॅक्टर त्यास जोडलेली ट्रॉली ताब्यात घेतली. तपासणीदरम्यान ट्रॉलीमध्ये अवैधरित्या वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळू असा एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३०/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३०५(ई) » पान २ वर

# बीडच्या मोमीनपुरा गोहत्या प्रकरणी चौघांना जामीन

## अ‍ॅड.अविनाश गंडले यांच्या युक्तिवादाला यश

**बीड । प्रतिनिधी**

मोमीनपुरा (कुरेशी मोहल्ला) परिसरात कथित गोहत्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चार आरोपींना मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड यांनी जामीन मंजूर केला आहे. आरोपींच्या वतीने अ‍ॅड. अविनाश पं. गंडले व अ‍ॅड. मोमिन एजाज यांनी न्यायालयात केलेल्या अभ्यासपूर्ण युक्तिवादानंतर हा आदेश देण्यात आला.

पेठ बीड पोलीस ठाण्याला २६ मे रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कुरेशी मोहल्ला परिसरातील एका पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकण्यात आला होता. यावेळी काही व्यक्ती

**पेठ बीड पोलिसांनी केलेल्या कारवाईतील चार आरोपींना न्यायालयाकडून दिलासा**

गौवंशीय जनावरांचे मांस कापत असल्याचे आढळून आल्याचा पोलिसांचा दावा आहे. तसेच घटनास्थळी काही गायी, कालवडी व लहान गोरे बांधलेल्या अवस्थेत आढळून आल्याने पोलिसांनी कारवाई करत चार जणांना ताब्यात घेतले होते. या प्रकरणी रिजवान खाजामिया कुरेशी (३०), सिद्दिक रजाक कुरेशी (४०), सैफ आत्तो कुरेशी (१९) आणि मुस्तकीन बाबु कुरेशी (३३, सर्व रा. कुरेशी मोहल्ला, पेठ बीड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासानंतर पोलिसांनी आरोपींना न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयात आरोपींच्या बाजूने अ‍ॅड. अविनाश गंडले व अ‍ॅड. मोमिन एजाज यांनी कायदेशीर बाबी व तथ्यांच्या आधारे सविस्तर युक्तिवाद मांडला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. के. डी. पाटील, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांनी चौघांनाही जामीन » पान २ वर

# राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचे कुमार-मुली दोन्ही संघ रवाना

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची सन २०२६-२७ सालची ५२ वी कुमार - मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या मान्यतेने किरण स्पोर्ट्स सोलापूर यांच्या विद्यमाने दि. ०२ ते ०५ जून, २०२६ या कालावधीत सोलापूर येथे आयोजित होणार आहे या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे कुमार-मुली हे दोन्ही संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी एमॅच्युअर खो-खो असोसिएशनी कुमार संघांचे प्रशिक्षण शिबिर शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई आणि मुलींचे राजर्षी शाहू कन्या विद्यालय बीड येथे घेऊन दोन्ही अंतिम संघ निवडला कुमार संघ (मुले) कर्णधार सुशांत तलवाडे,आयुष दिवाण सौरभ खरात,करण मोमीन,आर्यन घोलप,निशांत तलवाडे,कार्तिक » पान २ वर






# मेलोडी चॉकलेट वाटून काँग्रेसचे इंधन दरवाढी विरोधात निषेध आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या इंधन दरवाढीच्या धोरणाविरोधात बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. पेट्रोल-डिझेल दरवाढ आणि इंधन टंचाईच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी नागरिकांना मेलोडी चॉकलेट वाटप करत सरकारचा निषेध नोंदवला. हे आंदोलन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोळंके पेट्रोल पंप येथे आंदोलन करुन नंतर जिल्हाधिकारी यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले.




शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सोळंके पेट्रोल पंप येथे काँग्रेस कडून पेट्रोल, डिझेल दरवाढ विरोधात झालेल्या या निषेध आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हातात फलक घेत घोषणाबाजी केली. इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून महागाईने जनता त्रस्त झाली आहे,असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. तसेच डिझेल मिळत नसल्याने शेतीची कामे थांबली असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. तसेच थोडे-थोडे करीत भरमसाठ दरवाढ करण्यात आली आहे. याचा निषेध करीत उपरोधिक म्हणून इंधन भरण्यासाठी पेट्रोल पंपावर आलेल्या नागरिकांना मेलोडी चॉकलेट वाटप करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करत, दरवाढ मागे घेऊन पेट्रोल-डिझेलचे दर नियंत्रणात आणावेत तसेच इंधन टंचाई दूर करण्यासाठी » पान २ वर

दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अ‍ॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादक: अतुल शंकरराव जाधव
Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV